निवीदा

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचेकडील शासन निर्णय दि.२६.११.२०१४ पासून रु०३/- लक्ष व त्या पेक्षा जास्त किमतीच्या निवीदेकरीता ई- निवीदा पध्दतीचा अवलंब करण्याचे आदेश शासनाने दिले.

त्यास अधिन राहून महा.शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ यां.क. शासन निर्णय दि.२७.५.२०१५ अन्वये जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील रु.३.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या विविध विकास कामांना ई निवीदा कार्य प्रणाली लागु करण्या बाबत आदेशीत केलेले आहे. त्यास अधिन राहून जिल्हा परिषदेने अंमलबजावणी सुरु केली आहे.

जिल्हा परिषदेने बांधकाम विभागा अंतर्गत इमारती बांधकामे व रस्ते देखभाल व दुरुस्तीची कामे या शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येत आहेत.

या मध्ये खालील मजूर सह. संस्थेस वा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता,

सर्वसाधारण मक्तेदार यांना निवीदेत विहीत केल्या प्रमाणे निवीदा भरण्याकामी जाहिर निवीदा मागणी करणेत येते. त्या बाबत दैनिक वर्तमान पत्रकात प्रसिध्दी देण्यात येते.

१.नोंदणीकृत मजूर संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, सर्वसाधारण मक्तेदार यांना शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ई निवीदा प्रणाली प्रमाणे कामांची न्युनतम दराची निवीदा निश्चिती करण्यात येतात.

२.सदर निवीदा भरतांना मक्तेदारा कडून वा संस्थेकडून नोंदणी प्रमाणपत्र, आयकर , विक्रीकर, व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र समवेत मागवीणेत येते.

३.ई निवीदा प्रणालीमध्ये मक्तेदारांकडील प्रगतीत असलेल्या कामांचा व पुर्ण
झालेल्या कामांचा स्वतंत्र लिफाप्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

४. निवीदा धारकाला बयाणा रक्कम , निवीदा फॉर्म फी ही राष्ट्रीयकृत बॅकेमार्फत इ पेमेंट ने भरणा करुनच या प्रणालीमध्ये भाग घेता येईल.

५.निवीदा धारक यांना निवीदा वेबसाईटवर कागदपत्र अपलोड करुन भरणे आवश्यक राहील. व निवीदा धारकाकडून अशी अपलोड केलेली कागदपत्रे अंतीम दिनांकास निवीदा स्विकृती नंतर ई निवीदा मंजूरी बाबतचा समाचार भ्रमणध्वनीवर प्राप्त झालेवर तात्काळ मुळ कागदपत्र पडताळणी कामी सादर करणे आवश्यक राहील.

६. कोणतीही ई -निवीदा तांत्रिक व अन्य कारणामुळे मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार निवीदा प्रसिध्दी करणा-या संस्थेच्या प्रमुखांनी राखून ठेवलेले आहेत.